**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

वर्तकनगर प्रभाग समिती,
दिनांक :- २५/११/२०११

**मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा**
**सभा सुचना क्र. ०८ दिनांक २१/११/२०११**
**सभा क्रमांक ०८ दिनांक २५/११/२०११**

**सन्मा. श्री. /श्रीमती** --------------------------------------

सदस्य / सदस्या - वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा **शुक्रवार दिनांक २५/११/२०११ रोजी सकाळी ११.३० वा.** वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, २ रा मजला, येथे सभा सुचना क्र. ०८ दिनांक २१/११/२०११ च्या पत्रिकेवरील विषयावर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

**सदर सभेस उपस्थित असलेले सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **सन्मा. श्री. रामचंद्र लहु फडतरे** | **सदस्य (अध्यक्ष)** |
| २) | सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे | सदस्या |
| ३) | सन्मा. श्री. नागसेन गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ४) | सन्मा. सौ. वनितातार्इ गंगाराम इंदिसे | सदस्या |
| ५) | सन्मा. श्री. सुरेश दाजी भोईर | सदस्य |
| ६) | सन्मा. श्रीमती. छाया मनोहर राव | सदस्या |
| ७) | सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे | सदस्य |
| ८) | सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले | सदस्य |
| ९) | सन्मा. श्री. संतोष हरिश्चंद्र मोरे | स्वि. सदस्य |
| १०) | सन्मा. श्री. सुनिल आबाजी शिंदे | स्वि. सदस्य |
| ११) | सन्मा. श्री. संजय तुकाराम कदम | स्वि. सदस्य |

**सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| १) | सन्मा. श्रीमती. योगिता रमेश वैती | (अध्यक्षा ) |
| २) | सन्मा. श्री. हरीश्चंद्र श्रीपत पाटील | सदस्य |
| ३) | सन्मा. सौ. अनिता अशोक सावंत | सदस्या |
| ४) | सन्मा. श्री. सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ५) | सन्मा. सौ. परिषा प्रताप सरनाईक | सदस्या |
| ६) | सन्मा. श्री. सुधीर प्रल्हाद बर्गे | सदस्य |

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. सचिव महोदय प्रभाग समिती अध्यक्षा आज सभेला येवू शकलेल्या नाहीत. त्यामुळे या ठिकाणी उपस्थित ज्येष्ठ सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांनी आजच्या सभेचे अध्यक्षपद भूषवावे व सभेला मार्गदर्शन करावे अशी मी सुचना करतो.

**सन्मा. सदस्य श्री. संतोष वडवले :-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे यांनी जी सुचना मांडली आहे त्यास मी सर्व सदस्यांच्या वतीने अनुमोदन देतो.

**( सन्मा. सदस्य श्री. रामचंद्र फडतरे सभेच्या अध्यक्षस्थानी विराजमान होतात. )**

**कार्यालयीन अधिक्षक श्री. बाबासाहेब आंधळे सभेचा अजेंडा वाचून सभा सुरु करतात.**
**कार्यालयीन अधिक्षक श्री. बाबासाहेब आंधळे विषयपत्रिकेवरील खालीलप्रमाणे विषय वाचून दाखवितात.**

**प्रकरण क्रमांक** **विषय**

२३८. ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ७ दिनांक २४/१०/२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**सर्वानुमते मंजुर**

**कार्यालयीन अधिक्षक श्री. बाबासाहेब आंधळे :-**

मा. अध्यक्ष महोदय, विषय क्र. २३९ मध्ये सुधारणा करणेत आली असून सुधारीत गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

२३९. प्रभाग क्र. १६ मधील पोखरण रोड नं. १ वरील उपवन इलेक्ट्रीकल्स ते रामबाग उपवन वसाहत या रस्त्याला "कै. रावसाहेब इंदिसे मार्ग" असे नामकरण करणेबाबत.

**सर्वानुमते मंजुर**

२४०. प्रभाग क्र. ३८ मधील गल्ल्यांमध्ये नगरसेवक निधीतून चेकर लादी बसवून पायवाट बनविणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४१. प्रभाग क्र. ३९ मधील शिंगे यांचे घरामागील गल्लीमध्ये प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट बनविणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४२. प्रभाग क्र. १८ भिमनगर येथील साईनाथनगर सोसायटी परिसरात नाल्याच्या बाजूने नगरसेवक निधीतून ४ " व्यासाची जलवाहिनी अंथरणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४३. प्रभाग क्र. ११ मध्ये गावंडबाग , किरकीरेपाडा परिसरात नगरसेवक निधीतून २" व्यासाची जी. आय. जलवाहिनी अंथरणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४४. प्रभाग क्र. २८ मध्ये विविध ठिकाणी नगरसेवक निधीतून रिप-युज बिन्स पुरविणेबाबत.

**सर्वानुमते मंजुर**

**कार्यालयीन अधिक्षक श्री. बाबासाहेब आंधळे मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय वाचून दाखवितात.**

**-:आयत्यावेळचे विषय :-**

२४५. प्रभाग क्र. १७ मधील शिवाईनगर येथे नगरसेवक निधीतून विविध ठिकाणी किरकोळ स्थापत्य कामे करणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४६. प्रभाग क्र. १० मधील वसंतविहार येथील आम्रपाली मार्केटसमोरील पदपथांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४७. प्रभाग क्र. ३८ मधील साईव्हीला बंगला येथे नगरसेवक निधीतून पायवाट बनविणे.

**सर्वानुमते मंजुर**

२४८. प्रभाग क्र. १६ मधील शास्त्रीनगर पोखरण रोड नं. १ वरील हनुमान मंदिर व म्हाडा वसाहतीकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास "कै. रावसाहेब इंदिसे स्मृती चौक" असे नामकरण करणे.

**सर्वानुमते मंजुर**

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. अध्यक्ष महोदय, या वर्षी आपल्या वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रामध्ये महापौर चषक कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या स्पर्धा दि. ७ ते ११ नोंव्हेंबर २०११ दरम्यान होणार आहेत. त्याच दिवशी माझ्या प्रभागात बांधण्यात आलेल्या मिनी स्टेडीयमचा उद्‌घाटन सोहळा पार पडणार आहे. या परिसरामध्ये रस्त्यांचीही कामे चालू आहेत. याठिकाणी मी सर्व विभागाला विनंती करु इच्छितो की, जास्तीत जास्त कर्मचारी लावून साफसफाई, आरोग्य, विद्युत पुरवठा सुरळीत करणे व इतर अनुषंगिक कामे करणेत यावेत. या ठिकाणी किमान ७०० ते ८०० खेळाडू येणार आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. त्यांचेसाठी पार्किंगची व्यवस्था, रस्त्यांची साफसफाई, त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याने त्यांना वॉर्मअपसाठी रस्ते सुसज्ज ठेवणे आवश्यक आहे. विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्यात यावी. सर्व सन्मा. सदस्यांनी, अधिका-यांनी व कर्मचा-यांनीही स्पर्धेला उपस्थित रहावे. ब-याच वर्षातून या भागामध्ये स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेला कुठल्याही प्रकारे गालबोट लागता कामा नये याबाबत दक्ष रहावे ही विनंती.

**कार्यालयीन अधिक्षक**- (श्री. बाबासाहेब आंधळे ):-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे संबंधित विभागांना सुचना देण्यात येतील व आवश्यक ती सर्व व्यवस्था करणेत येईल.

**मा. अध्यक्ष महोदय :-**

आपल्या प्रभाग समितीचे ज्येष्ठ नगरसेवक श्री. दशरथ पालांडे यांनी महापालिकेमार्फत राज्य पातळीवरील कबड्डी स्पर्धांचे आयोजन केलेले आहे. त्यांचे प्रभागामध्ये नविन स्टेडीयमचे उद्‌घाटन होणार आहे. त्यामुळे एक वेगळाच आनंद या प्रभाग समितीमध्ये होणार आहे. महापालिकेच्या कोणत्याही स्पर्धा या भागात झालेल्या नाहीत. ही स्पर्धा आपल्याकडे होत आहे. याचा आपल्याला आनंद आहे. आपण त्या त्या दिवशी त्या त्या विभागाला न सांगता ४ तारखेलाच सर्व व्यवस्था प्रामुख्याने स्टेडियम तसेच आजूबाजूचे रस्ते, आवश्यक त्या परवानग्या , इत्यादीबाबत दुस-यांवर अवलंबून न राहता सर्व विभागांनी जबाबदारीने सदर ठिकाणी हजर रहावयाचे आहे. ....

.................. त्यामुळे या पाच वर्षातील चांगला उपक्रम त्यांच्या पाठपुराव्यामुळे या विभागाला एक स्टेडीयम मिळाले आहे. हे ठाणे शहरातीलच नव्हे तर महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी स्पर्धा होतील त्या त्या ठिकाणी उल्लेख होईल या प्रमाणे काम करावयाचे आहे. माझ्याही प्रभागात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात घोडबंदर परीसराचे नाव घेतले जाईल असे नाटयगृह बांधण्यात आले आहे. त्याचेही उद्घाटन सात तारखेच्या दरम्यान करणेची योजना आहे. या नाटयगृहातील तळ मजल्यावर ९० स्टॉल आहेत. याठिकाणी पालेभाज्या व फळ मार्केट प्रस्तावित आहे. पहिल्या मजल्यावर ४०० चौ. फुटांचे १४ गाळे आहेत. याठिकाणी जीवनावश्यक वस्तु मिळतील, दुस-या मजल्यावर ८००० चौ. फुटाचा हॉल उपलब्ध होणार आहे. महापालिकेमार्फत बुकिंग चालू करणार आहे. या ठिकाणी टिप -टॉप च्या हॉलचे भाडे दोन लाखापर्यंत आहे. या ठिकाणी कमीतकमी दरामध्ये हॉल उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे. किमान १० ते १२ हजार रुपयांपर्यंत भाडे आकारावे अशी विनंती करणार आहे. या दरामध्ये आज कुठेही हॉल उपलब्ध होत नाही. त्यामुळे या परीसरातील नागरीकांची सोय होईल. याठिकाणी ज्येष्ठ नागरीक केंद्र सुरु केले आहे. त्याचेही उद्घाटन होणार आहे. महिलांना ७ कि. मी. अंतरावर आरोग्य केंद्रासाठी जावे लागत आहे. तेही या ठिकाणी चालू करणार आहे. याचा लाभ या प्रभाग समितीतील नागरीकांना निश्चितपणे होईल. त्यामुळे आपल्या प्रभाग समितीतील अधिका-यांची निश्चितपणे जबाबदारी आहे. येणा-या पाहुण्यांना बरे वाटले पाहिजे. अशी व्यवस्था करणेत यावी. पुढच्या महिन्यात पहिल्याच आठवडयात उद्घाटन होणार आहे. अधिका-यांनी याबाबत जातीने लक्ष द्यायचे आहे. दोन महिन्यांमध्ये मार्च पर्यंत अत्यंत काळजीपूर्वक काम करावयाचे आहे. पाणी पुरवठा समस्या निर्माण होते. त्यामुळे इतरांना टिका करण्याची संधी मिळते. ती संधी आपण कोणालाही देता कामा नये. आरोग्य कर्मचा-यांनीही वेळोवेळी साफसफाई केली पाहिजे. दोन महिने महापालिकेच्या दृष्टिने वातावरण व्यवस्थित असले पाहिजे. त्यामुळे येणा-या संकटांतून आपणच मार्ग काढला पाहिजे. अतिक्रमण होता कामा नये याची काळजी निश्चितपणे घेतली पाहिजे. अनधिकृत बांधकामाचा मुद्दा राजकारण होता कामा नये. कोणत्याही कामाचा दुष्परीणाम त्या विभागाच्या लोकप्रतिनिधीला भोगावा लागणार आहे. त्यादृष्टिने दक्ष राहिले पाहिजे. यापूर्वी झालेल्या बैठकींमध्ये लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केलेला आहे. चांगली कामे झालेली आहेत तसाच कामाचा शेवटही चांगला झाला पाहिजे. याबाबत वरीष्ठ अधिका-यांशी चर्चा करणार आहे. माझ्या प्रभागामध्ये रस्त्यांची कामे चालू झालेली आहेत. प्रस्ताव मंजुर होत आहेत. १० तारखेपर्यंत ही कामे पूर्ण झाली पाहिजेत. आपण एकमेकांशी चांगल्या प्रकारे ५ वर्षे काढली आहेत. प्रभागातील ज्या ज्या रस्त्यांची कामे आहेत ती निश्चित पणे पूर्ण झाली पाहिजे. त्या प्रमाणे दिवाबत्तीची सोय झाली पाहिजे. जे जे उपलब्ध आहे ते उपलब्ध करुन दिले पाहीजे. वृक्ष प्राधिकरण पूर्ण प्रभागामध्ये काम करतात. प्रत्येक प्रभागामध्ये एकएक दोनदोन ठिकाणी झाडांच्या छाटलेल्या फांद्या पडलेल्या आहेत. त्या तरी उचलून टाका. माझ्या प्रभागामध्ये अनेक ठिकाणी झाडे पडलेली आहेत. काही जागेवरच सुकली आहेत. कारण नस्तांना नागरीकांना त्रास होता कामा नये. ही या प्रभाग समितीची शेवटची बैठक आहे असे समजू नका. अजून एक बैठक लावण्यात यावी. सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत, त्या निश्चितपणे आपआपल्या खात्याने मनापासून कामाला लागावे मी त्यांना विनंती करतो की, आपण आपआपल्या विभागामार्फत लोकप्रतिनिधींच्या सुचनांचे पालन कायदेशीरपणे कराल अशी अपेक्षा करतो. जे उपस्थित आहेत, जे अनुपस्थित आहेत त्या सर्वांना पुढच्या शेवटच्या बैठकीला आमंत्रण द्यावे जेणेकरुन ते त्यांच्या सुचना करतील व याचा त्यांना फायदा होईल. आज योगायोगाने आपण या ठिकाणी मला अध्यक्षपद दिले आहे निश्चितपणे सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे - क्रिडा / आरोग्य समिती सभापती व उपस्थित सदस्यांचे आभार मानतो व ही बैठक संपल्याचे जाहिर करतो.

## सदर सभेत खालील विषयांना मंजुरी देण्यात आली.

**प्रकरण क्रमांक:- २३८ विषय** :-ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ७, दिनांक २४/१०/२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २३८ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०७ दि. २४/१०/२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सन्मा. सदस्यांच्या सुचनेसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले अनुमोदक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- २३९ विषय** :- प्रभाग क्र. १६ मधील पोखरण रोड नं. ०१ वरील उपवन इलेक्ट्रीकल्स ते रामबाग उपवन वसाहत या रस्त्याला "कै. रावसाहेब इंदिसे मार्ग" असे नामकरण करणेबाबत.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २३९ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १६ मधील पोखरण रोड नं. ०१ वरील उपवन इलेक्ट्रीकल्स ते रामबाग उपवन वसाहत या रस्त्याला "कै. रावसाहेब इंदिसे मार्ग" असे नामकरण करणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे.

सबब, सदर प्रभाग क्र. १६ मधील पोखरण रोड नं. ०१ वरील उपवन इलेक्ट्रीकल्स ते रामबाग उपवन वसाहत या रस्त्याला "कै. रावसाहेब इंदिसे मार्ग" असे नामकरण करणेसाठी ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. नागसेन गंगाराम इंदिसे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- २४० विषय** :- प्रभाग क्र. ३८ मधील गल्ल्यांमध्ये नगरसेवक निधीतून चेकर लादी बसवून पायवाट बनविणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४० दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ३८ मधील गल्ल्यांमध्ये नगरसेवक निधीतून चेकर लादी बसवून पायवाट बनविणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- २४१ विषय** :- प्रभाग क्र. ३९ मधील शिंगे यांचे घरामागील गल्लीमध्ये प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट बनविणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४१ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ३९ मधील शिंगे यांचे घरामागील गल्लीमध्ये प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट बनविणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ३९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ३९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले अनुमोदक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- २४२ विषय** :- प्रभाग क्र. १८ भिमनगर येथील साईनाथनगर सोसायटी परिसरात नाल्याच्या बाजूने नगरसेवक निधीतून ४ " व्यासाची जलवाहिनी अंथरणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४२ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १८ भिमनगर येथील साईनाथनगर सोसायटी परिसरात नाल्याच्या बाजूने नगरसेवक निधीतून ४ " व्यासाची जलवाहिनी अंथरणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्यान्नव हजार पाचशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्यान्नव हजार पाचशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-सन्मा. सौ. वनितताई गंगाराम इंदिसे अनुमोदक :- सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- २४३ विषय** :- प्रभाग क्र. ११ मध्ये गावंडबाग , किरकीरेपाडा परिसरात नगरसेवक निधीतून २" व्यासाची जी. आय. जलवाहिनी अंथरणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४३ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ११ मध्ये गावंडबाग , किरकीरेपाडा परिसरात नगरसेवक निधीतून २" व्यासाची जी. आय. जलवाहिनी अंथरणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,८०,२००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष ऐंशी हजार दोनशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,८०,२००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष ऐंशी हजार दोनशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे अनुमोदक :- सन्मा. सौ. वनितताई गंगाराम इंदिसे**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- २४४ विषय** :- प्रभाग क्र. २८ मध्ये विविध ठिकाणी नगरसेवक निधीतून रिप-युज बिन्स पुरविणेबाबत.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४४ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. २८ मध्ये विविध ठिकाणी नगरसेवक निधीतून रिप-युज बिन्स पुरविणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,७०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सत्तर हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,७०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सत्तर हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्रीमती छाया मनोहर राव अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २४५ विषय** :- प्रभाग क्र. १७ मधील शिवाईनगर येथे नगरसेवक निधीतून विविध ठिकाणी किरकोळ स्थापत्य कामे करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४५ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १७ मधील शिवाईनगर येथे नगरसेवक निधीतून विविध ठिकाणी किरकोळ स्थापत्य कामे करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,३९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणचाळीस हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,३९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणचाळीस हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे अनुमोदक :- सन्मा. सौ. वनितातार्इ गंगाराम इंदिसे**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २४६ विषय** :- प्रभाग क्र. १० मधील वसंतविहार येथील आम्रपाली मार्केटसमोरील पदपथांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४६ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १० मधील वसंतविहार येथील आम्रपाली मार्केटसमोरील पदपथांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये २,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये २,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २४७ विषय** :- प्रभाग क्र. ३८ मधील साईव्हीला बंगला येथे नगरसेवक निधीतून पायवाट बनविणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४७ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ३८ मधील साईव्हीला बंगला येथे नगरसेवक निधीतून पायवाट बनविणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४९,७२५/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास हजार सातशे पंचवीस मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४९,७२५/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास हजार सातशे पंचवीस मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २४८ विषय** :- प्रभाग क्र. १६ मधील शास्त्रीनगर पोखरण रोड नं. १ वरील हनुमान मंदिर व म्हाडा वसाहतीकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास "कै. रावसाहेब इंदिसे स्मृती चौक" असे नामकरण करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४८ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १६ मधील शास्त्रीनगर पोखरण रोड नं. १ वरील हनुमान मंदिर व म्हाडा वसाहतीकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास "कै. रावसाहेब इंदिसे स्मृती चौक" असे नामकरण करणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे.

सबब, सदर प्रभाग क्र. १६ मधील शास्त्रीनगर पोखरण रोड नं. १ वरील हनुमान मंदिर व म्हाडा वसाहतीकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास "कै. रावसाहेब इंदिसे स्मृती चौक" असे नामकरण करणेसाठी ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. नागसेन गंगाराम इंदिसे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २४९ विषय** :- प्रभाग क्र. ०९ मधील देवदर्शन सोसायटी फेज - २कडे जाणा-या रस्त्याचे नगरसेवक निधीतून मजबुतीकरण करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २४९ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ०९ मधील देवदर्शन सोसायटी फेज - २कडे जाणा-या रस्त्याचे नगरसेवक निधीतून मजबुतीकरण करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये २.००,००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये २.००,००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २५० विषय** :-प्रभाग क्र. ०९ मधील गार्डन इस्टेट येथे ज्येष्ट नागरीकांसाठी नगरसेवक निधीतून बैठक व्यवस्था करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २५० दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ०९ मधील गार्डन इस्टेट येथे ज्येष्ट नागरीकांसाठी नगरसेवक निधीतून बैठक व्यवस्था करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९४,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष चौ-यान्नव हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९४,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष चौ-यान्नव हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- २५१ विषय** :- प्रभाग क्र. ०९ मधील प्रेस्टीज पार्क रस्त्याचे देवदर्शन सोसायटी ते प्रेस्टीज पार्क पर्यंतच्या भागाचे नगरसेवक निधीतून डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे.

**मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २५१ दिनांक २५/११/२०११**

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ०९ मधील प्रेस्टीज पार्क रस्त्याचे देवदर्शन सोसायटी ते प्रेस्टीज पार्क पर्यंतच्या भागाचे नगरसेवक निधीतून डांबरीकरणाने मजबुतीकरण करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये २,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये २,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे अनुमोदक :- सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**(तदनंतर मा. अध्यक्ष महोदय दुपारी ०१.०० वा. सभा संपल्याचे जाहिर करतात.)**

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती,

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा संपल्याची वेळ दुपारी ०१.०० वा.

दिनांक २५/११/२०११

**कार्यालयीन अधिक्षक**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.